# आभा द "इव्हिनिंग ग्लोरी"

एक मे दोन हजार वीस ! कॅलिफोर्नियातल्या एका गावात एका गृहसंकुलापुढे दोन गाडया येऊन थांबल्या. प्रवेशव्दारावर पाटी होती " Evening Glory "..त्याखाली छोटया अक्षरात लिहिलं होतं " AABha " ! "आभा" पुढे थांबलेल्या पुढच्या गाडीतून एक मराठी जोडपं उतरलं. मागच्या गाडीतून त्यांचा मुलगा, सून आणि नातवंडं बाहेर पडली. नातवंडांनी हातात फुलझाडांच्या दोन छोटया कुंड्या धरल्या होत्या. प्रवेशव्दारासमोर वेगवेगळ्या वयाचे दहाबारा मराठी लोक हातात कुंडया धरून उभे होते. बायका छान साडया नेसल्या होत्या. सर्वांनी टाळ्या वाजवून आजोबा आजींचं स्वागत केलं. एका गृहस्थांनी पुढे येऊन त्यांच्या हातात लहानशी पाम ची झाडं दिली आणि सर्वांची पालखी वाजत गाजत एका सभागृहापुढे येऊन थांबली. "आजोबा आजी " जोशी यांच्या वन प्रवेशाचा म्हणजे "वानप्रस्थाश्रमाचा" हा स्वागतसमारंभ !
या दिवसाची पूर्वतयारी जोशी दांपत्याने सुमारे दहा वर्षापूर्वीच केली होती... सेवानिवृत्ती, मोठ्या घरातून लहान घरात जाणे, नातवंडांचं संगोपन, असे प्रवासाचे टप्पे पूर्ण करत ते इव्हिनिंग ग्लोरी या ज्येष्ठ नागरिकांच्या वसाहतीत ( रिटायर्डमेंट कम्युनिटी) कायमचे रहायला आले होते.
वर वर पहाता अमेरिकेतील अन्य कोणत्याही "निवृत्ती वसाहती"सारखी दिसणारी ही वसाहत. वेगवेगळ्या आकाराची आणि प्रकारची टुमदार निवासस्थानं, सुंदर बगीचे, पोहोण्याचे तलाव, पायवाटा, भोजनगृह, सभागृह, ग्रंथालय, एका बाजूला विकलांग वृध्दांसाठी निवास, अगदी टेनिस कोर्ट आणि चिमुकला गोल्फ कोर्ससुध्दा ! पण "आभा" नावाच्या या वसाहतीचं वैशिष्ठय नावापासूनच दिसत होतं. प्रवेशव्दाराची भारतीय कमान, वरच्या भागातला ओंकार, आत रहाणारे बहुसंख्य भारतीय चेहेरे, . वसाहतीच्या मध्यावर छानसं ओंकारमंदिर , पुढे दीपमाळ, सभामंडप, एका कडेला छोटं चर्च, बागेत विखुरलेल्या मूर्ती.. कुठे कृष्णाच्या तर कुठे बुध्दाच्या... झाडांखालचे भारतीय बनावटीचे झोपाळे, काही झोपडीसारखी कुटिरं.. काही निवासांना भारतीय नावंही ...एखाद्या निवासस्थानाच्या दारावर " येथे देशपांडे रहात नाहीत. ते शेजारी रहातात. दुपारच्या वेळी बेल वाजवून त्रास देऊ नये " अशी पुणेरी पाटीही दिसते...
मंदिराभोवतीच्या प्रशस्त ओवऱ्यांमध्ये भारतीय संगीत, भाषा, योगासनांचे वर्ग.. गंथालयात भारतीय भाषांमधील पुस्तकाचे विभाग,... मुख्य म्हणजे भोजनगृहातून येणारे मसाला डोसा, वांग्याची भाजी वगैरे पदार्थांचे वास ! या वसाहतीची पहाणी करायला पूर्वी जोशी पती –पत्नी आले होते तेव्हा निवृत्तांच्या वसाहतीशी विसंगत वाटणारे बालसंगोपन गृह पाहून जोशी बाई जरा बुचकळ्यात पडल्या होत्या.
"अग, येतो कोणाच्या आयुष्यात असा उशीरा वसंत ! त्यांच्यासाठी सोय असेल ही ! " असा विनोद तेव्हा जोशी बुवांनी टाकला होता. पण व्यवस्थापकांनी त्यामागचा विचार सांगितला तेव्हाच प्रभावित होऊन जोशींनी "आभा" मध्ये आपलं उरलेलं आयुष्य व्यतीत करण्याचा विचार पक्का केला होता.
निवृत्त जीवनाचा विषय जोशींच्या आयुष्यात प्रथम डोकावला तो १९८५च्या सुमारास.. बृममंच्या अधिवेशनात निवृत्तांसाठी चाललेलं एक चर्चासत्र त्यांना दिसलं. पण जोशी आडनावाच्या तरुणीनं या "म्हाताऱ्या" चर्चासत्राकडे ढुंकूनही पाहिलं नाही. "आपल्याला काय करायचं आहे याचा विचार करून ? आपण पाच वर्षांनी भारतात परत जाणार आणि बाबांनी पुण्यात बांधून ठेवलेल्या आपल्या 'उत्तरायण' बंगल्यात कसे आरामात रहाणार !" असं म्हणत जोशी नावाचा तरुण आपल्या नवपरिणित बायकोच्या हातात हात घालून चहाच्या शोधात गेला होता.
त्यानंतर १९९१च्या सुमाराला लॉस एन्जेलिसच्या अधिवेशनात या विषयावर एक चर्चासत्र होतं. याही चर्चासत्राला हजर रहाण्याइतके जोशी अजून "म्हातारे" नव्हते. पण या सत्रात बाबांचे एक जुने मित्र बोलणार होते. त्यांनी आग्रहाने ओढून नेऊन तिथे बसवलंच. शिवाय पाच वर्षांनी भारतात परत जाण्याचा विचार जरा डळमळीत झाला होता. तेव्हा अमेरिकेत रहाण्याचे प्रश्न यावर कोण काय विचार करतात याबद्दल थोडं कुतुहल होतं.. या चर्चासत्रात बोलणारे सगळेच काही ज्येष्ठ नागरिक दिसले नाहीत. काही त्यांच्यासारखेच चाळीशीत होते. एका वक्त्याने निवृत्तीचे वेळापत्रकच मांडले. चाळीसपासून अखेरपर्यंत करायच्या गोष्टींची यादी त्यात होती.. या सत्रात वेगवेगळ्या पातळीवरून आणि दृष्टिकोनातून निवृत्तीचा आणि त्यानंतरच्या प्रश्नांचा उहापोह केला गेला. निवृत्त झाल्यावर भारतात जाणे विरुध्द अमेरिकेत रहाणे, आपली जीवनपध्दती, मुले, नातवंडे, आर्थिक प्रश्न, आरोग्यसेवांच्या सुविधा, भावनिक आणि मानसिक प्रश्न, स्त्रियांच्या दृष्टिकोनातून निवृत्तीचा विचार, परावलंबी वा विकलांग झाल्यावरचे प्रश्न, दोघांपैकी एक मागे राहिल्यावरचे प्रश्न, भारतातून निवृत्त होऊन मुलांजवळ येऊन राहिलेलया शून्याच्या
पिढीचे अनुभव अशा कितीतरी गोष्टी ऐकतांना " आपण आलो ते बरं झालं " असं जोशींना वाटलं. "हे सत्र इथेच

संपलं नाही. यापुढे मराठी समाज म्हणून आपण काहीतरी कृतीची योजना आखूया " असं समारोपात सांगतांना चर्चा प्रमुखांनी एक प्रश्नावली हातात ठेवली, तीही जोशींनी उत्साहाच्या भरात भरून दिली.....
.....नंतर मध्ये काही वर्षे वाहून गेली. अधून मधून मित्रमंडळींना जेवायला बोलावलं की गप्पांच्या ओघात कधी गाडी निवृत्तीकडे वळे ! असे गावोगावचे जोशी "काहीतरी केलं पाहिजे " म्हणून चर्चा करीत होते.
"तिकडे फ्लॉरिडात म्हणे देशपांड्यांनी अशी कम्युनिटी बांधली आहे. त्यांना विचारू. .."
"आपण एकदा ती ज्युईश कम्युनिटी पाहून येऊ..." ..." तिकडे इंग्लंडला मराठी लोक येऊन खूप वर्ष झाली. तेव्हा त्यांनी काय केलं आहे ते विचारू. " " अहो, मराठी आहेत कितीसे ? ते सगळे एका गावी थोडेच येणार ? प्रत्येकाला आपापल्या मुलांजवळच कुठेतरी रहायला हवं असतं. " " ही कम्युनिटी जर फक्त मराठी लेकांसाठी नसेल तर मग काय उपयोग ? आम्हाला नाही पंजाबी शेजारी आवडणार. मग आमचे आता आहेत ते ग्रीक शेजारी काय वाईट ?" ... " व्हे ! आम्हाला मराठी शेजारी मुळीच नकोत. आम्ही गेलोच तर 'आंल अमेरिकन' व साहतीत रहायला जाणार. .." अहो कशाला हवी आपल्याला निवृत्तांची वसाहत ? आम्ही तर बाई आमच्या थोरल्याकडेच जाणार !" ... असे अनेक उलटसुलट वारे वेगवेगळया ठिकाणच्या मराठी लोकात वहात होते.

एका गावच्या चार मित्रांनी शेजारी शेजारी घरं घेतली . आपला निवृत्तीचा प्रश्न सुटला असे त्यांना वाटले.
अरविंद आणि सुलभानं निवृत्तीसाठी अॅरिझोनातली वसाहत निवडली. खास बुध्दिवंतांसाठी असलेल्या या वसाहतीत प्रत्येकजण किमान पी. एच. डी. असलाच पाहिजे अशी म्हणे अट होती.
प्रभा इंडियानातल्या एका छोटया गावात विज्ञानाची प्राध्यापक होती. अविवहित आणि स्वतंत्र विचारांची. तिने गावातल्याच निवृत्त वसाहतीत नांव नोंदवलं. भोवती देशी चेहेरे पहायची तिला सवय लागलेलीच नव्हती. त्यामुळे भारतीय वसाहतीत रहाण्याची गरजच तिला वाटत नव्हती.
नमिता आणि निखिल एकदा न्यूझिलंडच्या सफरीला गेले आणि त्या देशाच्या प्रेमातच पडले. निवृत्तीनंतर तिकडे जायचा विचार ते गंभीरपणे करत होते.
विश्वास आणि निरुपमा यांनी कोकणातले आपल्या जुन्या घराचे रुपांतर सुंदर फार्म हाऊसमध्ये केले होते. "पडू आजारी तेव्हा गावातले हॉस्पिटल उत्तम आहे. त्या वयात काय करायचे कृत्रिम हृदय बसवून ? फार तर पाच वर्षे कमी जगू ! " असा विचार त्यांनी केला होता.
सुस्मिता आणि सर्वोत्तम यांनी गोव्याजवळच्या आपल्या गावी वृध्दाश्रम सुरू करण्यात पुढाकार घेतला आणि निवृत्तीनंतर दरवर्षी सहा सहा महिने त्या आश्रमाच्या कामासाठीच वेळ दिला. अमेरिका ते भारत हा प्रवास सोसेनासा झाला की "सांजसावल्या" या आपल्या वृध्दाश्रमात कायमचे रहाण्याचा त्यांचा निर्णय पक्का होता.
सुखदा आणि अमोल यांनी विचार केला की शेवटी मुलं आपली असली तरी ती अमेरिकन आहेत. आपणाला सांस्कृतिक जवळीक वाटते ती आपल्या भावंडांशी. तेव्हा त्यांनी भावंडांबरोबर भारतात आपले आयुष्य घालवण्याचा निर्णय घेऊन तशी योजना केली होती. सुखदाच्या पुण्यात रहाणाऱ्या बहिणीची मुले शिक्षणाला अमेरिकेतच आली होती. त्यामुळे तिलही 'मुलांजवळ' रहाण्याची कल्पना सोडावी लागली होती.
विमलाताई आणि आप्पासाहेब अमेरिकेत आले तेच साठाव्या वर्षी. त्यानंतर पंधरा वर्षांच्या पहिल्या कालखंडात मुलांकडे राहून त्यांनी नातवंडांना सांभाळले. नंतरच्या दुसऱ्या कालखंडात मुलाच्या घराजवळच दोन खोल्यांचे अपार्टमेंट घेऊन मजेत रहायला लागले. सोशल सिक्युरिटी, अपार्टमेंटचा सवलतीचा दर, पौरोहित्य करून मिळणारे थोडेफार पैसे, यामुळे त्यांना "स्वावलंबी" वाटण्याइतकं समाधान होतं. अमेरिकन , भारतीय सर्वांशीच मैत्री. घराजवळ दुकाने.. अगदी भारतीय उपहारगृहसुध्दा ! त्यामुळे रोजची अडचण नसे. आसपासचे मराठी , गुजराथी लोक मंडळाच्या कार्यक्रमाला अगत्यानं बोलावून नेत. आनंदी वृत्ती, स्वतःची काळजी घेण्याची सवय, नियमित व्यायाम, भरपूर वाचन आणि वार्धक्याची जाणीवपूर्वक मानसिक तयारी या सर्वामुळे त्यांची कालक्रमणा सुखानं चालली होती. ....
निर्मलाताई आणि भाईसाहेब अमेरिकेत आले तेव्हा त्यांची मुले हायस्कूलला होती. त्यांचाही प्रवास काहीसा विमलताई आणि आप्पासाहेबांसारखा. पण निवृत्तीचं आर्थिक नियोजन भरभक्कम झालेलं. मुलीच्या– जाह्नवीच्या घराजवळच त्यांनी छोटंस घर घेतलं. भाईसाहेबांचे अमेरिकन मित्र भरपूर. त्यांच्या व्यावसायिक जगाशी त्यांचे निवृत्तीनंतरही संबंध होते. बौध्दिक, मानसिक, भावनिक सर्वच पातळयांवर समृध्द जीवन ते जगत होते. अटटयांऐशीव्या वर्षी भाईसाहेबांना थोडा स्मृतिभ्रंशाचा त्रास सुरु झाल्याचे लक्षात आले. घरीच परिचारिका आणून थोडेफार प्रयोग झाले. पण त्यापेक्षा निवृत्त वसाहतीत जाणे जास्त सोयीचे असे सर्वांनी मिळून ठरवले. जाह्नवीने घराजवळची एक सर्वात्तम आणि महागाची वसाहत निवडली. अमेरिकन जगात रहायला दोघांनाही कोणतीच अडचण नव्हती. कधी पास्ता खाऊन कंटाळा आला तर जाह्नवी घरून पोळया भाजी घेऊन येत असे. दर संध्याकाळी तिची चक्कर असेच. शिवाय तिथल्या शेफनेही हौसेने भारतीय पदार्थ शिकून घेतले. मुलगी मराठी मंडळाच्या कार्यक्रमालाही घेऊन जाई. सुटटीला नातवंडे येत. पण सगळं काही उत्तम असूनही भाईसाहेब म्हणत, " अगं, हे काही आपलं घर नव्हे !" तेव्हा मुलीला आणि जावयाला भयंकर अपराधी वाटे !

याउलट सरिताचं ! तिनं हट्टा हट्टानं स्मृतिभ्रंश झालेल्या आपल्या आईला घरीच ठेवायचा निर्णय घेतला. योगायेगाने तिचा भाऊ आणि लग्न झालेला मुलगाही त्याच गावात. त्यामुळे मदत करायला भरपूर गोतावळा होता. पण दिवसेदिवस सर्वांनाच ते कठीण जात होतं. सगळीच भावंडं अमेरिकेत असल्यामुळे आता या स्थितीत आईला भारतात परत पाठवणं अशक्य होतं. सरिताला वाटे, " आपल्या आईला तीन मुलं आहेत. पण आपल्याला तर एकच मुलगा. आपल्यावर असं अपंग व्हायची वेळ आली तर तो किती पुरा पडणार ?..... " एकेकाळी निवृत्तीनंतर भारतात जाण्याचा विचार तिने केला होता. पण त्यातली व्यर्थता तिला कळून चुकली होती....

विनिता अविवहित आणि एकुलती. वडील गेल्यावर आईला अमेरिकेत घेऊन आली. आईला इंग्रजीचा गंधही नव्हता. पंच्याऐशीव्या वर्षी ती घरात पडली.. रुग्णालयात आईला भयंकर असुरक्षित वाटले. कारण भाषा कळात नव्हती. विनिताला नोकरी सोडून चोविस तास तिच्याबरोबर रहाणे शक्य नव्हते. आईला घरी आणल्यावरही विनिता धास्तावली.

"आपण घरात नसतांना आईला काही झाले तर ? ..." असा विचार तिची झोप उडवून जात होता. शेवटी मन घट्ट करून तिने जवळच्या अपंगसदनात आईला ठेवले. आईने अन्न पाणीच सोडले. रोज संध्याकाळी विनिता आईला भेटायला जाई आणि तिला भरवे. आईचा एकाच धोशा, "मुझे घर जाना है । ".....

पवनेशचे वडील पुण्यात रहात. ते आजारी पडले, तेव्हा तो किंवा बायको कोणीच घरचे व्याप टाकून त्यांना भेटायलाही जाऊ शकले नाही. मग त्यांची सेवा करणं तर सोडाच. त्यांचं सर्व पवनेशच्या बहिणीला करावं लागलं. जेव्हा आपल्या मुलांच्या संगोपनासाठी मदत लागली तेव्हा पवनेशने आईवडिलांचे तिकिट पाठवले आणि हक्काने त्यांना बोलावून घेतले. त्यावेळी वडिलांनी त्यांचे जग त्यांचे करिअर थोडे बाजूला ठेवून यावे अशी अपेक्षा त्याने व्यक्त केली. त्यांच्या सोयी गैरसोयींचा फारसा विचारच केला नाही. भारतात त्याने खेपा मारल्या त्या प्रत्येक वेळी त्याने कौतुकाचे पाहुणचार करून घेतले. वृध्द होत जाणाऱ्या आईवडिलांचे रोजचे प्रश्न त्याला सोडवावे लागले नाहीत . या सर्व गोष्टींचा विचार करतांना त्याच्या मनाने एक प्रश्न त्याला विचारला "आपण आपल्या आई वडिलांचं काही करू शकत नाही, मग आपल्याला आपल्या मुलाकडून तरी अपेक्षा करण्याचा अधिकार काय ".... हा प्रश्न अंतःर्मुख करणारा होता. .. त्याने भारतातले वार्धक्य पाहिले नव्हते , तसे अमेरिकेतलेही वार्धक्य फारसे जवळून पाहिलेच नव्हते !...पण त्याचे स्वतःचे वार्धक्य मात्र दर दिवशी जवळ येत होते !

असे काही लोक सन दोन हजार च्या सुमाराला निवृत्तीनंतरचे विचार गंभीरपणे करायला लागले. काहींनी विचार मंथन गट सुरु केले. काहींनी दोन दिवसाची शिबिरे घेतली. भारतीय म्हणून वसाहत हवी असे सर्वांनाच वाटत होते. पण केवळ मराठीच हवेत का अन्य भारतीय चालतील, वसाहतीचे अर्थशास्त्र, जागा, इ. इ. अनेक विषयांवर चर्चा ! शेवटी कुणीतरी म्हणाले, " अरे, आपण अजून नुसताच विचार करत आहोत ! तिकडे गावात जैनांनी वसाहत बनवली..गुजराथ्यांनी एक चाळ विकत घेऊन आपली वस्ती मांडली. शिखांनी गुरुद्वारा भोवतची घरं विकत घेऊन त्यांची वसाहत बनवली. आपण निदान त्या पाहून तरी येऊया ! अमेरिकन वसाहातिबरोबर बोलणू करू आणि त्यांच्यातला एक कोपरा मिळतो का पाहू ! काहीच नाही जमलं तर गुजराथी वसाहतीत नांव नोंदवू या. .....

त्या समुद्रमंथनातून निर्माण झाली " आभा " – " ईव्हिनिंग ग्लोरी " ही निवृत्त भारतीयांची टुमदार वसाहत. अमेरिकन वसाहातीची टवटवीत समृध्दी व सुखसोयी आणि भारतीय आश्रमीय जीवनाची साधी सोपी पण समाधानी हृब्य शैली यांचा मिलाफ सांधण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे.. व्यवस्थापनात निवासी लोकांच्या समितीचा सहभाग असल्याने प्रत्येकाला हे "आपले घर" वाटते. प्रत्येकाच्या शारीरिक कुवतीनुसार व मानसिक परिस्थितीनुसार त्यांच्या मेंदू, मन व शरीराला कार्यक्षम ठेवण्यासाठी ये थे विचार केला जातो. कोणी स्वयंसेवक म्हणून तर कोणी नोकरी म्हणून वसाहतीत विविध जबाबदाऱ्या उचलतात. बागकामापासून ते भोजनापर्यंत आणि विकलांच्या सेवेपासून ते सबलांच्या मनोरंजनापर्यंत कोणत्याही प्रकारची "सेवा" करण्याचे स्वातंत्र्य आहे. नव्या भाषा शिकण्याची, नवे छंद जोपासण्याची प्रत्येकाला संधी आहे.

आपल्या आर्थिक व शारीरिक कुवतीनुसार आणि आवडीनुसार निवासस्थान आणि जीवनशैली निवडता येते आणि कालमानानुसार ती बदलता येते. जगण्याचा आनंद, समाधान, एकमेकासाठी काही करण्याचा आनंद आहे आणि , जगण्यात अर्थ आहे, असं वाटायला लावणारे सगे सोबती आहेत. वसाहतीत आपले शेजारी मराठी हवेत की अन्य भारतीय चालतील हे ठरवता येते. त्यामुळे विविध भाषिकांसाठी विभाग असले तरी, तसे रहायलाच हवे असा आग्रह कुणी करत नाही. येथे भारतीय चेहेऱ्यांबरोबर काही अमेरिकनही असतात. काही ना काही कारण ाामुळे भारतीय जीवनाची आवड निर्माण झालेले किंवा भारतीय जोडीदार असलेले असे अमेरिकन इथे आनंदाने रहातात..
.

आईबाबांना भेटायला मुले, नातवंडे इ थे येत असतात. भारतीय चित्रपट , नाटके पहायला वसाहतीबाहेर रहाणारे भारतीयही येतात. एवढेच नव्हे , तर गावातली मुले मुली आपल्या मुलांना बेबीसीटिंगसाठी निर्धास्तपणे येथील

बालसंगोपन केंद्रात आणून सोडतात.
तिथल्या आजी आजोबांना "नातवंडा"चा आनंद मिळतो. मुलांनाही मजा येते. पोरांना घेऊन येणारी ही दुसऱ्या पिढीची मुले मुली आपल्या आई वडिलांसारख्याच काका काकींशीही सुखदुःखाच्या गप्पा मारतात. कधी सल्ला घेतात.. कधी नातवंडांच्या वयाची शाळकरी मुले मुली या वसाहतीत 'व्हॉलेंटिअर' म्हणून येतात. या वर्दळीमुळे स्वत:ची मुले रोज भेटायला आली नाहीत तर ते जाणवत नाही.

त्यामुळे ही निवृत्तांची वसाहत हे भारतीय समाजाचेही केंद्र आहे. आरोग्य तपासणीला येणारे डॉक्टर पुष्कळदा दुसऱ्या पिढीचे भारतीय असतात. त्यांच्या आपुलकीचा स्पर्श एखाद्या आजीबाईंना मुलाची नाहीतर नातवाची आठवण करून देतो. त्यामुळे येथे विकलांग वृध्द दिसले तरी त्यांच्या डोळयात एकाकीपणाच्या भयाण सावल्या दिसत नाहीत की असुरक्षिततेची भीती त्यांना वाटत नाही. म्हणून इथल्या संध्याकाळला "आभा" आहे. "आश्रम ऑफ अमेरिकन भारतीय" अशा या वसाहतीततले काही निवासी आश्रमीय जविनाचा आनंद घेतात. काही सभोवतालच्या अमेरिकन जगातला आनंद उपभोगतात. कोणी ओंकार मंदिराच्या गाभाऱ्यात ध्यान करतांना दिसतात कोणी लॉस वेगासच्या सहलीला जातात..कोणी आपल्या "घरी" शेजाऱ्यांना जेवायला बोलावतात." घरी" कंटाळा आला तर भोजनगृहात जाऊन मराठीत नाहीतर तामीळमध्ये तावातावाने चर्चा करत भुरके मारत जेवतात.... कुठे काव्यवाचनाचा कार्यक्रम रंगात आलेला दिसतो. .. एकाद्या निवासावर तोरण बांधलेले दिसते, आणि विमाताई नातू

झाल्याचे पेढे वाटतांना दिसतात... दुसऱ्या एखाद्या निवासात, चंपूताई कमाताईंना मुलाच्या घटस्फोटाबद्दल सांगतांना दिसतात.. अपंगनिवासातल्या अनामिकाताईंना भेटायला सुखमणी बोस काठी टेकत जातांना दिसतात... एखाद्या दिवशी कोणाच्या मृत्यूची वार्ता पसरते आणि नेहेमीचा खिदळणारा ब्रिजचा अड्डा गंभीर होतो... असे सुखाचे
आणि दुःखाचे प्रसंग येतात. एकमेकांच्या सोबतीने लोक ते धकवून नेतात...
आभा हे एक मोठे कुटुंबच आहे.. 'वसुधैव कुटुंबकम्' या वचनाची आठवण करून देणारे... म्हणूनच एक मे दोन हजार वीस या दिवशी आभामध्ये कायमचे रहायला आलेल्या जोशी आजोबा आजींना नातवंडांना 'बाय्' म्हणतांना जड गेले नाही !.......

विद्या हर्डीकर
ल हाब्रा हाईट्स, कॅलिफोर्निया